# पोलीस दैनिक गुन्हे वार्तापत्र
# नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
# दिनांक 26/02/2020 (बुधवार)
# (दुपार)

## जनावरांची अवैधरीत्या वाहतुक करणाऱ्या आरोपीविरूद्ध गुन्हा नोंद

पो.स्टे. सावनेर :– दिनांक 25/02/2020 रोजी पोहवा कृष्णा जुनघरे हे पोलिस चौकी पाटणसावंगी येथे कार्यरत असतांना सायंकाळी 16/30 वा. फोन व्दारे माहिती आली की, सावनेर नागपूर रोडवरील सागर रेस्टॉरेंट समोर एक एम. एच.– 27/एक्स– 7081 क्रमांकाच्या झेनॉन पीकअप गाडीचा चालक वाहन सोडून पळुन गेला आहे. सदर वाहन तपासले असता त्यामध्ये 12 गाई कि. 48,000/–रू. ही जनावरे निर्दयतेने वाहतुक करताना मिळून आले. त्यापैकी 2 गाई मृत अवस्थेत आढळुन आली. सदर वाहनात जनावर व वाहनासह एकुण किंमती 2,98,000/– रु. चा मुद्देमाल जप्त करण्यात आलेला आहे.

सदर प्रकरणी सरकार तर्फे पालिसे हवालदार कृष्णा जुनघरे, पो.स्टे. सावनेर यांचे रिपोर्टवरून पो.स्टे. सावनेर येथे वरील आरोपीविरुध्द कलम 429 भादवी सहकलम 11(1)(अ)(ड) प्राणि निर्दयतेने वागणुक प्रतिबंधक कायदा, सहकलम 83/177 मोवाका काद्ययान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोलीस हवालदार कृष्णा जुनघरे 9923023053 हे करीत आहे.

## विनयभंग

पो.स्टे. जलालखेडा :– दि. 24/02/2020 चे 14:15 वा. ते 14.30 वा. चे सुमारास 17 वर्षीय पीडित/फिर्यादी हि 12 वी चा पेपर देवून बाहेर कॉलेजच्या पार्कींग मध्ये उभी असतांना आरोपी नामे– आदेश हरिहर काळे, वय 25 वर्ष, रा. रिधोरा, ता. काटोल हा पीडितेस मनास लज्जा उत्पन्न होईल असे कृत्य करून तिचा विनयभंग केला. तसेच आरोपीने पिडीतेचा पाठलाग करून छेड काढीत होता.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरुन पो.स्टे. जलालखेडा येथे आरोपीविरुध्द कलम 354, 354(अ), 354(ड) भादंवि. सहकलम 12 बाल लैंगिक अत्याचार प्रतिबंधक कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीला अटक करण्यात आली आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास महिला पोलिस उपनिरीक्षक जगताप 8421401099 या करीत आहे.

## पळवून नेणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल

पो.स्टे. काटोल – दिनांक 24/02/2020 चे 20.00 वा. ते 20.30 वा. चे सुमारास पो.स्टे. काटोल हद्दीत फिर्यादी यांची 17 वर्षीय अल्पवयीन मुलगी हीला अज्ञात आरोपीने फिर्यादीच्या कायदेशीर रखवालीतून फुस लावून पळवून नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरुन पो.स्टे. काटोल येथे आरोपीविरुध्द कलम 363 भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून सदर गुन्हयाचा पुढील तपास सहायक फौजदार जवाहर चव्हाण हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर